# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १८९-२२** **दिनांक :- २३/०६/२०२२**

## वसई एव्हरशाईन येथे वेश्या दलालावर कारवाई करुन अल्पवयीन मुलीची सुटका-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा वसई यांची कारवाई

दिनांक २२/०६/२०२२ रोजी आचोळे पोलीस ठाण्याचे हद्दीत रुम नं.१४ इंद्रपुरम बिल्डींग एव्हरशाईन सेक्टर ७, वसई पुर्व ता. वसई जि. पालघर येथे एक महिला वेश्यादलाल वेश्यागमनाकरीता मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे पोलीस निरीक्षक श्री संतोष चौधरी यांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोनि चौधरी, सफौ/प्रकाश विक्रम निकम, पोहवा बापु महारू पवार, मपोहवा साक्षी डोइफोडे, पोहवा महेंद्र पुंडलिक शेटये, रोशन नारायण किणी, मपोशि/काजल पाटील, चालक पोहवा/०७०६६ सुनिल विष्णु पागी सर्व नेम. अनै.मा.वा.प्र.कक्ष वसई तसेच बोगस गिर्हाईक व दोन पंचासह जावुन छापा टाकला असता एक महिला वेश्या दलाल आरोपी वय ४२ वर्षे हीस ताब्यात घेतले व एक अल्पवयीन पिडीत मुलगी वय १५ वर्षे ४ महिने हीची सुटका करण्यात आली आहे.

सदर कारवाईबाबत सफौ प्रकाश निकम यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन आचोळे पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं ३०६/२०२२ भादंविस कलम ३६६ (ए), ३७० (१), ३७२ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ सह पोक्सो ॲक्ट १७, १८ प्रमाणे दिनांक २२/६/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून महिला आरोपीस अटक करुन पुढिल तपास आचोळे पोलीस ठाणे यांचे मार्फतीने चालू आहे.

सदरची कारवाई श्री विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) अती. कार्य. पोलीस उपआयुक्त, (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा वसई युनिटचे पोनि/संतोष चौधरी आणि पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

---ooo---